**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – प्रतिक कृष्णा जाधव

माझे वय – ३५ वर्षे,

व्यवसाय – पोलिस कॉन्स्टेबल /१२२७

रा. – मालवण पोलिस स्टेशन

**<u>सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. टी.ए.भणगे यांचे मार्फत</u>**

०१. दि.१४/१२/२०२३ रोजी माझी मालवण पोलिस स्टेशन येथे नेमणूक होती. सदर दिवशी संध्याकाळी ५.३० वाजता प्रभारी अधिकारी यांचे आदेशान्वये स.पो.नि.सोनवलकर,पेडणेकर, घागरे, चालक पाटील यांच्यासह शासकिय वाहनाने मसूरे येथे गेलो. मसूरे दूरक्षेत्र येथे गेल्यानंतर उपविभागीय पोलिस अधिकारी घनशाम आढाव व प्रभारी अधिकारी प्रविण कोल्हे हजर होते. त्यांनी सांगितले की, कालावल खाडीमध्ये जो अवैद्य वाळू उपसा सूरु आहे त्या वाहतूक करणा–या डंपरवरती कारवाई करावयाची आहे. त्यानंतर आम्ही चिंदर येथे गेलो. दूध डेअरीच्या जवळ असलेल्या फाटयाजवळ थांबलेलो होतो. संध्याकाळी ७.१५ वाजता एक डंपर येताना दिसला. सदरचा डंपर कोण थांबविला हे मला सांगता येणार नाही. सदर डंपरची पाहाणी केली असता त्यामध्ये वाळू होती. सदर डंपरच्या चालकाला त्याचे नाव विचारले होते. मला सदर डंपर चालकाचे नाव सांगता येणार नाही. डंपर चालकाकडे पासबाबत विचारले. त्याच्याकडे कुठलाही पास नव्हता. त्यानंतर सदर घटनेबाबत पेडणेकर यांनी फिर्याद दिली होती. मला डंपर चालक दाखविल्यास मी त्याला ओळखू शकतो. (निशाणी क्र.१८ वरती आरोपीचा हजेरीमाफीचा अर्ज.)

सरतपास पूर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, दि. १४/१२/२०२३ रोजी तथाकथीत घटनास्थळी हजर होतो ही बाब दर्शविण्यासाठी माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय कुठलाही पुरावा नाही. आम्ही छाप्यासाठी गेलेल्या वाहनाचा क्रमांक एमएच १२ एसक्यू २०२८, एमएच ०७ एजी २२६८ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वरील नमूद वाहनांनी घटनास्थळी गेलो होतो हे मी खोटे सांगत आहे. माझ्याकडे वरील वाहन छाप्यासाठी नेण्यात आले होते ही बाब दर्शविण्यासाठी कुठलाही पुरावा नाही. डंपर हा भगवंतगड कडून आच–याकडे जात होता. छाप्याच्या वेळेस सर्वजण एकत्र थांबलो होतो. आम्हाला सदरचे वाहन साधारणपणे शंभर मीटर अंतराहून दिसले होते. वाहन हे सोनवलकर यांनी हात दाखवून थांबविले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे असे म्हणणे आहे की, वाहन थांबविल्यानंतर सोनवलकर यांनी चौकशीस सूरुवात केली. वाहन हे सोनवलकर यांच्यापासून साधारणपणे पाच फूट अंतरावरती थांबविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी कारवाईच्या वेळेस हजर नव्हतो, हजर असल्याबाबत मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांनी नोंदविलेला जबाब माझा असलाबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेबाबत मला प्रत्यक्ष काहीही माहिती नाही. मी वाळू कोठून आणली याबाबत चौकशी केली होती. डंपर चालकाने तेरई येथे असलेल्या वाळूच्या रॅंपवरुन वाळू आणल्याचे सांगितले होते. तेरई रॅंप याठिकाणी पोलिस पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीप्रमाणे साक्ष देण्याचा प्रयत्न करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : १६/१२/२०२४

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण